International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# भारतातील शेतकरी आत्महत्या: कारणे आणि उपाययोजना

**डॉ. विशाल शिवाजीराव करपे[1], डॉ. एल . एस. सिताफुले[2]**

[1]सहयोगी. प्रा. आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख, विभाग प्रमुख, लोकनेते माणिकराव गावीत महाविद्यालय, बेलोसे वाणिज्य, विसरवाडी. जिल्हा नंदुरबार. Email: dr.vishalkarpe@gmail.com, मोबाइल: ७५८८०५६२४१
[2]सहयोगी. प्राध्यापक व अर्थशास्त्र, एन. के. वराडकर कला, आर. व्ही. महाविद्यालय दापोली. जिल्हा रत्नागिरी, Email: sluxumanjaya@gmail.com, मोबाइल: ९९७०११८८८४

कृषीप्रधान भारत देशात आजही शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतातील ६९ टक्के ग्रामीण भागात राहत असणाऱ्या लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती किंवा शेतमजुरी आहे. भारतात ०६ लाख पेक्षा अधिक खेडी आहेत. सुरुवातीच्या कालखंडापासूनच देशात रोजगार निर्मिती, राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा, भांडवल निर्मिती, परकीय चलन प्राप्ती, उद्योगांना कच्चामालाची उपलब्धता, चारा निर्मिती या विविध क्षेत्रात कृषी क्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण राहिलेली आहे. त्यामुळेच शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजले जाते. भारतीय अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्थेच्या अवस्थेपर्यंत पोहोचविण्यामध्ये शेतीची योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. असे असले तरी आज कृषी क्षेत्रात अनेक समस्या निर्माण झालेले आहेत त्यामुळे शेती व शेतकरी अडचणीत सापडले आहेत उत्पन्न व खर्चातील तफावत, उत्पादन खर्चात वाढ, सिंचनाचे अल्प प्रमाण, दारिद्र्यात वाढ, वाढते तुकडीकरण आणि अपखंडण, लागवड क्षेत्रात घट, अल्पभूधारक शेतकरी, कर्जबाजारीपणा, भांडवलाची कमतरता, निसर्गाचा लहरीपणा, विपणन व्यवस्थेतील दोष, व्यापारी व दलालांची मनमानी, विजेची टंचाई, हवामानातील बदल सरकारच्या धोरणातील बदल, जागतिकीकरण अशा विविध संकटात शेतकरी सापडलेला आहे. त्यामुळे शेतकरी जगण्याप्रती निरागस होऊन स्वतःचा आत्मविश्वास कमी झाला आहे. परिणामी तो विष प्राशन करून किंवा गळफास घेऊन आत्महत्या करत असल्याचे विदारक चित्र संपूर्ण भारतात दिसत आहे. शेतकरी आत्महत्या हा प्रश्न भारतातच नाही तर तो अमेरिका, संयुक्त राष्ट्र, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, श्रीलंका या देशातही शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. या अनुषंगानेच सदरील संशोधन पेपर मध्ये भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) भारतातील प्रमुख राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची स्थिती जाणून घेणे .

२) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कारणांचा अभ्यास करणे.
३) शेतकऱ्याच्या आत्महत्येवरील उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती:**

या संशोधन पेपर मध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. संशोधांनाचा कालावधी सन २०१४ ते सन २०२३ हा एक दशकाचा घेतला आहे. माहिती संकलनासाठी द्वितीयक साधनांचा अवलंब केला असून यात गुन्हे नोंद विभागाचे (NCRB) अहवाल, महाराष्ट्रची आर्थिक पहाणी, इतर अहवाल, संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्र, अर्थसंवाद, वेबसाईड, यांचा वापर केला आहे.

**भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या:**

भारतात १९९१ च्या आर्थिक धोरणानंतर भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहेत. प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश व छत्तीसगड या राज्यात शेतकरी आत्महत्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. १९ मार्च १९८६ रोजी चिलगव्हाण (जिल्हा यवतमाळ) साहेबराव करपे हे शेतकरी आत्महत्या केलेले पहिले शेतकरी कुटुंब समजले जाते.केंद्र सरकारने सन २००८ मध्ये केलेली शेतकऱ्यांची कर्जमाफी किंवा त्यानंतर महाराष्ट्र सरकारची कर्जमाफी यामुळेही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्याचे किंवा कमी झाल्याचे दिसून येत नाही. शेतीमध्ये चिरस्थायी शास्वत बदल घडवून आणणे अत्यंत गरजेचे आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (NCRB) अहवालानुसार सन १९९५ ते सन २०२२ या कालावधीत भारतातील ३९६९१२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. देशातील एकूण आत्महत्येपैकी ६.६ टक्के आत्महत्या शेतकऱ्यांच्या आहेत. यावरून या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येते. सन २०२२ मध्ये भारतातील ५२०७ शेतकरी आणि ६०८३ शेतमजुरांनी (एकूण ११२९०) आत्महत्या केल्या.

**भारत आणि प्रमुख राज्यातील शेतकरी आत्महत्या (२०१४ ते २०२३)**

| **वर्ष** | **महाराष्ट्र** | **कर्नाटक** | **आंध्र प्रदेश** | **मध्य प्रदेश** | **भारत** |
|---|---|---|---|---|---|
| **२०१४** | ४००४ | ७६८ | ६३२ | ११९८ | १२३३६ |
| **२०१५** | ३०३० | ११७२ | ४१६ | ५८१ | १२६०२ |
| **२०१६** | ३६६१ | २०७९ | ४२७ | १३२१ | ११३७९ |
| **२०१७** | २४२६ | ११५७ | ३७५ | ४२९ | ५९५५ |
| **२०१८** | २२३९ | १३६५ | ३६५ | ३०३ | ५७६३ |
| **२०१९** | २६८० | १३३१ | ६२८ | १४२ | ५९५७ |
| **२०२०** | २५६७ | १०७२ | ६५४ | २३५ | ५५७९ |
| **२०२१** | २६४० | ११७० | ४४८ | ११७ | ५३१८ |
| **२०२२** | ४२४८ | २३९२ | ९१७ | ६४१ | ११२९० |
| **२०२३** | २७०८ | १३२३ | ३६९ | उ. ना. | उ. ना. |

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | **३०२०३** | **१३८२९** | **५२३१** | **४९६७** | **७६१७९** |
| **सरासरी** | ३०२० | १३८३ | ५२३ | ५५२ | ८४६४ |
| **वृद्धीदर (टक्के)** | -३२.३७ | ७२.२७ | -४१.६१ | -४६.४९ | -८.४८ |

**संदर्भ** : राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाचे(NCRB) विविध अहवाल.

भारत आणि महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश व मध्य प्रदेश या राज्यातील २०१४ ते २०२३ यादरम्यान आत्महत्या केलेले शेतकऱ्यांची संख्या दर्शवली आहे. या दहा वर्षाच्या कालावधीत भारतात ७६१७९ शेतकऱ्यांनी आपले आयुष्य संपविले. भारतात सर्वात अधिक आत्महत्या सन २०१५ मध्ये झाल्या आहेत तर सर्वात कमी आत्महत्या सन २०२१ मध्ये ५३१८ झाल्या आहेत. सन २०१७ नंतर शेतकरी आत्महत्येचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्य शेतकरी आत्महत्येच्या बाबतीत सर्वात आघाडीवर आहे. या दहा वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रात भारतातील एकूण शेतकरी आत्महत्यापैकी ३९.२० टक्के आत्महत्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केल्या आहेत. त्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर कर्नाटक आणि आंध्र प्रदेश राज्यांचा समावेश होतो. या प्रमुख चार राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण ६९.८६ टक्के आहे. महाराष्ट्रात सन २०२२ मध्ये सर्वाधिक ४२४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर सर्वात कमी २२३९ शेतकऱ्यांनी आत्महत्या सन २०१८ मध्ये केल्या आहेत. महाराष्ट्रात या दहा वर्षाच्या कालावधीत सरासरी ३०२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर कर्नाटक व मध्य प्रदेश राज्यात सरासरी प्रतिवर्षी अनुक्रमे १३८३ व ५५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यासमोर असणारी आसमानी व सुलतानी संकटांमुळे शेतकरी आत्महत्या झाल्याचे दिसून येते.

## शेतकरी आत्महत्येची कारणे

जागतिक बँकेचे अर्थतज्ज्ञ पानगरिया यांनी भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्तेपैकी मात्र २५ टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या शेती संबंधित कारणांमुळे होत असल्याचे मत मांडले आहे. शेतकरी आत्महत्येची करणे खालील प्रमाणे आहेत.

### कर्जबाजारीपणा

भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्तेचे सर्वात प्रमुख कारण शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आहे. भारतीय शेतकरी दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेला आहे. सीमान्त धारण क्षेत्र, सिंचन सुविधेचा अभाव, लहरी मान्सून, उत्पादन खर्चात वाढ, शेतमालाला मिळणारा अत्यल्प भाव, सहाय्यक किंवा पूरक उद्योगचा अभाव या सारख्या कारणांमुळे कर्ज काढणे अपरिहार्य ठरते. राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण कार्यालयाने (NSSO) केलेल्या सर्वेक्षणानुसार आजही भारतातील ४० टक्के शेतकरी कर्जाकरिता खाजगी सावकारावर (४३ टक्के बँका आणि १५ टक्के सहकारी संस्थांवर) अवलंबून आहेत. सवकरांचा व्याजदर खूप अधिक असल्यामुळे घेतलेल्या कर्जाची परतफेड न झाल्याने नैराष्येत येऊन आत्महत्या केल्या जातात.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

**अल्पभूधारक शेतकरी:**

ज्या शेतकऱ्याकडे १ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्र असते त्यास अल्पभूधारक शेतकरी म्हणतात. भारतात लोकसंख्येचा विस्फोट, शेतीचे विभाजन आणि तुकडीकरण, ग्रामीण भागात औद्योगिक क्षेत्राचा अभाव, औद्योगिकीकरनाचा कमी वेग, जमिनीशी जोडलेले भावनिक नाते याकारणांमुळे प्रति शेतकरी जमीन धारण क्षेत्र अत्यंत कमी झाले आहे.

**भारतातील शेतकऱ्यांचे शेतजमिनीच्या आकारमानानुसार वर्गीकरण:**

| **शेतकऱ्याचा प्रकार** | **शेतकऱ्यांचे प्रमाण (टक्के)** | **जमिनीचे प्रमाण (टक्के)** |
|---|---|---|
| अल्पभूधारक | ६८.४५ | २४.०२ |
| लहान | १७.६२ | २२.९१ |
| मध्यम | ९.५५ | २३.८४ |
| मोठे | ४.३७ | २९.२३ |
| **एकूण** | **१००** | **१००** |

**संदर्भ: Agriculture Senses २०१५-१६**

भारतातील धारणक्षेत्रानुसार शेतकऱ्यांचे वर्गीकरण वरील तक्त्यात दर्शविली आहे. भारतात एकूण शेतकऱ्यांपैकी १ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ६८.४५ टक्के आहे तर त्यांच्याकडे देशातील एकूण जमिनीपैकी मात्र २४.०३ टक्के क्षेत्र आहे. मोठ्या (४ हेक्टर पेक्षा जास्त जमीन) शेतकऱ्यांचे प्रमाण ४.३७ टक्के असून त्यांच्याकडे एकूण जमिनीपैकी २९.२३ टक्के जमीन आहे. भारताचे सरासरी भूधारण क्षेत्र १.०८ हेक्टर आहे. सर्वाधिक सरासरी भूधारण क्षेत्र नागालँड राज्याचे ५.०६ हेक्टर आहे. तर सर्वात कमी भूधारण क्षेत्र केरळ राज्याचे ०.१८ हेक्टर आहे. प्रति शेतकरी धारण क्षेत्र कमी असल्यामुळे शेतकऱ्यास पुरेशा प्रमाणात जमीन नसल्यामुळे मिळणारे उत्पन्न कमी मिळते त्यामुळे कर्जबाजारीपणा वाढतो.

**कोरडवाहु क्षेत्र आणि निसर्गाचा लहारीपणा :**


भारतीय शेती निसर्गाचा जुगार समजाला जातो. भारतात सिंचनाचे प्रमाण ५२ टक्केच आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्यात सिंचनाचे प्रमाण १८ टक्यांपेक्षा कमी आहे. मागील १२ वर्षापासून महाराष्ट्र सरकारने सिंचनाचे प्रमाण जाहीर करण्याचेच बंद केले आहे. यावरून सिंचांनाबाबतची सरकारची उदासिनता दिसून येते. बागायती क्षेत्रात निसर्गाचे अवलंबत्व काही प्रमाणात कमी होते, तसेच एक पेक्षा अधिक पिकांचे उत्पादन शक्य होते. पर्यावरणातील बदलामुळे पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाण

कमी होत आहे, दोन पावसाच्या दरम्यान मोठा खंड पडत आहे, एकाच वेळी खूप जास्त पाऊस (ढगफुटी), पिकांवर वेगवेगळ्या प्रकारची कीड, थंडी किंवा उष्णतेची लाट यासारख्या कारणांमुळे शेतीच्या उत्पन्नात कमालीची घट होत आहे.

**सार्वजनिक क्षेत्राची कृषी खर्चातील घट:**

कोणत्याही क्षेत्राच्या विकासात सार्वजनिक खर्चाची भूमिका अत्यंत महत्वाची असते. भारतात आजही ६९ टक्के लोकसंख्या खेड्यात वास्तव्य करते, ज्यांचा प्रमुख व्यवसाय शेती किंवा शेतमाजुरी आहे. भारतात १९५१ पासून आर्थिक नियोजनाद्वारे अर्थव्यवस्थेचा विकास करण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेला. विशेषत: पहिली व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत कृषि आणि ग्रामीण विकासावर विशेष भर देण्यात आले.

**आकृती क्र. १ भारतातील पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्रावरील खर्चाचे प्रमाण.**




**स्त्रोत:** नियोजन आयोग वआणि निती आयोगाचे अहवाल.

वरील आकृती क्र. १ मध्ये भारतातील पंचवार्षिक योजनेतील एकूण खर्चात कृषी क्षेत्रावरील खर्चाचे प्रमाण दर्शविले आहे. भारतात १२ पंचवार्षिक योजनेद्वारे ६७ लक्ष ५६ हजार कोटी रु. खर्च करण्यात आला. यापैकी कृषी क्षेत्रावर मात्र ८ लक्ष ३० हजार कोटी ( मात्र ८.२ टक्के) रु खर्च करण्यात आला. विशेषत: सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून कृषी क्षेत्रातील घट वेगाने झाल्याचे दिसून येते, त्यामुळे शेती व शेतकरी संकटात सापडला आहे.

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना

भारतीय शेती आजही अर्थव्यवस्थेचा कणा समजली जाते. कोव्हीड-१९ सारख्या जागतिक महासंकटात याच क्षेत्राने भारताला जगातील वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनवले आहे, परंतु शेती व शेतकरी अत्यंत

वाईट परिस्थितीतून जात आहेत. यांना वेळीच बाहेर काढणे गरजेचे आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी खलील उपाययोजना आवश्यक आहेत.

**सिंचन सुविधांचा संख्यात्मक व गुणात्मक विकास:**

स्वातंत्र्याच्या जवळपास आठ दशकानंतरही आपण देश पातळीवर फक्त ५२ टक्के क्षेत्रच सिंचनाखाली आणले आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण १८ टक्यांपेक्षा कमी आहे. देशात लहान-लहान धरणे, ब्यारेज, शेततळे, बांध-बंदिस्ती, पाझर तलाव यासारख्या माध्यमाद्वारे पावसाच्या पाण्याचे संकलन करणे अत्यावश्यक आहे. तसेच ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पिकांना अच्छादन यासारख्या माध्यमाद्वारे पाण्याचा युक्ततम वापर करणे गरजेचे आहे.

**कमी व्याजदरात, मुबलक व योग्य वेळी भांडवलाची उपलब्धता**:

भारतीय शेतकरी दारिद्र्याच्या दुष्टचक्रात सापडलेला आहे. त्याचे उत्पन्न, बचत, गुंतवणूक अत्यंत कमी आहे. शेतीचा खर्च भागविण्यासाठी तसेच शेतीत आधुनिक तंत्राचा वापर करण्यासाठी त्याला भांडवलाची नितांत आवश्यकता असते. हे भांडवल कमी व्याजदराने, पुरेशा प्रमाणात व योग्य वेळी उपलब्ध झाले तर त्याचा उत्पादक कार्यासाठी वापर होऊन शेतकऱ्याच्या उत्पन्नात चिरस्थायी वाढ होणे शक्य आहे.

**कृषी उत्पादनास योग्य भाव आणि सक्षम विपणन व्यवस्था:**

शेतमाल एकमेव उत्पादन आहे ज्याची किंमत उत्पादक न ठरविता शासन निश्चित करते. भारतातील कृषी उत्पादन खर्च व मूल्य आयोग २३ शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीची (MSP) शिफारस केंद्र सरकारला करते. सरकार देशातील दारीद्र्याचा विचार करून जाणीवपूर्वक शेतमाळच्या किंमती कमी ठेवते. अनेकवेळा बाजारातील प्रत्यक्ष किंमत हमीभावापेक्षा कमी असते. कृषितज्ज्ञ डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या सिफरशींची अमलबजावणी करणे गरजेचे आहे. विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सान २०१७ मध्ये पुढील ५ वर्षात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा केली होती, परंतु प्रत्यक्षात ती आली नाही. व्यापारी वर्गद्वारेही शेतकऱ्याची आर्थिक पिळवणूक होते. त्यामुळे शेतमालासाठी सक्षम वितरण व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

**करार आणि गट शेतीचा विकास:**

भारतातील सुमारे ७० टक्के शेतकरी अल्पभूधारक आहे. त्यांच्याकडे पुरेसे भांडवल नाही न ते आधुनिक तंत्राचा अवलंब करू शकतात. त्यामुळे करार शेतीद्वारे त्यांना दर्जेदार आदानांचा पुरवठा व्यापारी वर्गाकडून होईल तसेच भाव व विक्रीची हमी प्राप्त होईल. पंजाब राज्यात कंत्राटी शेतीमुळे प्रतिहेक्टरी

उत्पादन क्षमता २५ ते ४० टक्के वाढल्याचे दिसून आले आहे. गटशेतीमुळे धारणक्षेत्राचा विस्तार होऊन मोठ्या उत्पादनाच्या अंतर्गत व बाह्य बचतीचा लाभ होईल.

**कृषी पूरक उद्योगांचा विकास:**

६९ टक्के ग्रामीण भारताचा प्रमुख व्यवसाय शेती किंवा शेतमजुरी आहे. कोरडवाहू शेतीत अत्यंत कमी दिवस रोजगार प्राप्त होते तसेच छुप्या बेरोजगारीचे प्रमाण उच्च आहे. त्याकरिता ग्रामीण भागात कुक्कुटपालन, शेळी पालन, दुग्ध व्यवसाय, मत्सशेती, रेशीम उद्योग यासारख्या कृषी पूरक व्यवसाय किंवा जोडधंद्याचा विकास होणे गरजेचे आहे.

**सारांश**:

वरील प्रकारच्या शाश्वत उपाययोजना कार्यक्षमपणे राबविल्या गेल्या तरच जगाचा पोशिंदा चांगल्या प्रकारे पोट भरू शकेल. २०४७ च्या विकसित भारतात कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्वाची राहील. फक्त प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेद्वारे प्रतिवर्षी ६००० रु शेतकऱ्याला देऊन त्यांना कमकुवत वनविण्यापेक्षा त्यांना चांगली आदाने व त्यांच्या शेतमालाला उचित भाव दिल्यास तो आत्मनिर्भर बनेल. अन्यथा त्याची हीच परस्थिती राहिल्यास मकरंद अनासपुरेंच्या शब्दात 'भविष्यात एक दाण्यासाठी हा देश गहाण ठेवावा लागेल'.

## संदर्भ

1. Behere and Bhise(2009), Farmers' suicide: Across culture, Indian Journals of Psychiatry, Pp 242-243.
2. Agricultural Statistics at a Glance (2022), Government of India, Ministry of Agriculture & Farmers Welfare Department of Agriculture & Farmers Welfare Economics & Statistics Division, New Delhi.
3. Korde Sudam, महाराष्ट्रातील शेतकरी कारणे आणि उपाय, Review of Research Journal (2019), Volume-8, Issue-5.
4. दैनिक सकाळ दिनांक ५ मार्च २०२०
5. अर्थसंवाद
6. https://www.statista.com/chart/32258/reported-suicides-of-farmers-farm-laborers-in-india/